**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ११ मे २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २८८/२०२३ भादवि ३८०,५११ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/०५/२०२३ रोजी १५.०० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०५/२०२३ रोजी ००.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीकांत बबन बनपट्टे,वय-४० वर्षे,रा- ६०३,सायली हाईटस वसंत विहार सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | सोमनाथ हरिदास सुरवसे,वय-३४ वर्षे,रा- तोडकर वस्ती बाळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हा नोकरीकरीता घरातून बाहेर गेला असता फिर्यादीची पत्नी घरकाम करीत असताना फिर्यादीचे राहते घराचे उघडया दरवाज्यातून वरील आरोपीत हा प्रवेश करून बेडरूम मध्ये जावून आतून कडी लावून चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना फिर्यादी हे जेवण करण्यासाठी घरी आले तेव्हा बेडरूमला आतून कडी असलेले पाहिले फिर्याद हा जोर-जोरात दार वाजवत असताना आतून कडी उघडून वरील आरोपी हा फिर्यादीस धक्का देवून पळून जात असताना फिर्यादीने त्यास पकडले म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ११८६/घुगे- ७५०७४४४२२२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५१/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०५/२०२३ रोजी ११.३० वा. चे सुमारास सिध्देश्वर चहा कॅन्टींग शेजारी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०५/२०२३ रोजी १६.३० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अतुल अनिल साळुंके,वय-४० वर्षे,रा- १४/ए,जवाहरलाल हौसिंग सोसायटी अंत्रोळीकर नगर भाग-१,होटगी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १५,०००/- रु एक हिरो होंडा सीडी डिलक्स मोटारसायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ए एम १७३८ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या सहमतीशिवाय, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ११८७/फुलारी- |

## सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६९/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/०५/२०२३ रोजी १५.०० वा. गोलु नाष्टा सेंटर साईबाबा चौक रामवाडी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०५/२०२३ रोजी २२.५८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | खाजप्पा सोमलिंग दोडयाळकर,वय-२५ वर्षे,रा- शहानगर वांगीरोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ७,०००/- रू एक सॅमसंग कंपनीचा जी ए ०३ मॉडेलचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हा गोलु नाष्टा सेंटर साईबाबा चौक रामवाडी येथे नाष्टा करण्यासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीने शर्टाच्या वरच्या खिश्यात ठेवलेला वरील वर्णनाचा व किंमतीचा मोबाईल गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेला आहे.म्हणून. तपासः- पोना/१३८२/क्षीरसागर- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९४/२०२३ भादवि ४२०,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०५/२०२३ रोजी ११.४५ वा. फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०५/२०२३ रोजी १९.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | जयश्री पुंडलिक माने,वय-७४ वर्षे, रा- ०३,मार्केंडेय नगर गृहनिर्माण सोसायटी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन अनोळखी इसम. |
| **फसवणुक र** | : | १,२०,०००/- रू ४ तोळे सोन्याचे लॉकेट त्यात गणपती व ओम असे जुवाकिअ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी ही घरी एकटीच असून घरात बसली असता अनोळखी दोन इसम वय अंदाज २५ ते ३० वयोगटातील असून ते अंगाने जाड मध्यम बाध्याचे व त्यापैकी एकाचे अंगात पांढऱ्या रंगाची पॅन्ट शर्ट व दुसऱ्या इसमाचे अंगात फिक्कट गुलाबी रंगाचा शर्ट घातलेले दोन अनोळखी इसम फिर्यादीच्या घराजवळ येऊन आम्ही भांडी पॉलिश करून देतो असे सांगून घरात येऊन फिर्यादीच्या हातातील पाटल्या बघून आम्ही पाटल्यापण पॉलिश करून देतो असे म्हणाल्यावर फिर्यादी त्यास मला काही पॉलिश करायचे नाही असे म्हणाले तेव्हा त्या दोन अनोळखी इसमापैकी एकाने फिर्यादीचे गळयातील वरील वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे लॉकेट पॉलीश करून देतो असे म्हणाला तेव्हा फिर्यादीचा विश्वास बसल्याने फिर्यादीने त्यांना विरोध केला नाही तेव्हा सदर आरोपीत यांने सोन्याचे लॉकेट घेऊन घराचे बाहेर पळून गेले आहे. म्हणून. तपासः- पोसई रजपूत- **९९२२६११२२२** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९६/२०२३ भादवि ३०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०१/०५/२०२३ रोजी १३.३० वा. ४५६,निलम नगर गंगा चौक आकाशवाणी केंद्र रोड सोलापूर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०५/२०२३ रोजी २२.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरेखा गोपीचंद सरवदे,वय-३३ वर्षे,रा- ४५६,निलम नगर गंगा चौक आकाशवाणी केंद्र रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | नागराज यादव रा- हैद्राबाद तेलंगणा |
| **मयताचे नाव** | : | अर्चना ज्ञानेश्वर कोटा,वय-३८ रा- हैद्राबाद तेलंगणा |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीची बहिण मयत-अर्चना ही हैद्राबाद तेलंगणा येथे राहत होती गेल्या तीन महिन्यापुर्वी अर्चना हीचे पती मयत झाले होते. सदर मयत-अर्चना हिचे सासरे राजय्या कोटा यांनी हैद्राबाद येथील चारमिनार शाहअली बंडा याठिकाणी ३००० हजार स्केवर फूट असलेली जागा ही अर्चना हिस बक्षीसपत्र दिले होते.गेल्या तीन वर्षापुर्वी त्यातील १००० हजार स्केवर फूट जागा ही आरोपीत नामे नागराज यादव यास २३ लाखाला विकलेली होती, सदर जागेवर १८ रूम होत्या त्यापाडून त्या जागेवर फिर्यादीची बहिण अर्पाटमेन्ट बांधणार होती त्यामुळे यातील आरोपीत यांचे घरी फिर्यादीची बहीण (मयत) अर्चना ही त्याचे दोन मुले शांतनु व मुलगी अक्षरा याच्यासह भाडयाने राहण्यास गेली.तेव्हा परत यातील आरोपीत यांने उर्वरित राहलेल्या जागेपैकी १००० स्केवर फूट जागा ही ४० लाखाला विकत घेतली.सदर एकंदरीत खरेदी विक्री व्यवहार झालेले रक्कम यातील आरोपीत यांने पुर्णपणे न देता न वटणारे चेक देवून व तसेच या ना त्या कारणास्तव मयत अर्चना हीस सारखे त्रास देणे व वरील आरोपीत यांचे घरात भाडयाने असल्याने तिस नळयाचे पाणी घेऊ न देणे असे वारंवार करत असल्याने ती नेहमी फिर्यादीस फोनवर सांगत असत त्यामुळे फिर्यादी स्वत: हैद्राबाद येथे आरोपीत यांचे घरी जावून बहीणीस भेटून तिला तिथे जेथे जास्त त्रास होत असल्याने यातील आरोपीत यांचेकडे भाडयाने राहत असलेले घर फिर्यादीचे बहिणीस रिकामे करण्यासा सांगून तिचे प्रापांचिक सामान थोडया अंतरावर तेथे एक दुसरे घर भाडयाने घेऊन तेथे फिर्यादीने तीचे बहिणीस यातील मयत अर्चना हिस तिचे दोन्ही |

| | | |
|---|---|---|
| | | मुलासह ठेवले.त्यानंतर फिर्यादीची मोठी बहिण यातील मयत ही दिनांक ०१/०५/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. चे सुमारास मुलगी अक्षरा हिच्यासह फिर्यादीचे राहते घरी सोलापूर येथे आली होती.<br>तरी वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची बहिण मयत अर्चना ही फिर्यादीच्या घरातील बेडरूममधील स्लॅबला असलेल्या सिलिंग फॅनला पांढरी ओढणीच्या साहाय्याने फिर्यादीची मोठी बहिण अर्चना हीने तेलगू भाषेमध्ये व्हिडीआ रेकॉर्ड करून यातील नागराज यादव यांच्या त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या करत आहे<br>फिर्यादीची मोठी बहिण मयत-अर्चना हिस काहीना काही कारणाने यातील आरोपीत नागराज यादव यांने नाहक त्रास देऊन तिस आत्महत्येस प्रवृत्त करून तिच्या मृत्यूस कारणीभूत झालेला आहे.म्हणून. तपासः- सपोनि चौधरी- **८६९८९५०२०४** |